नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/05/2023 (मंगळवार) दुपार

## घरफोडी

१) पो.स्टे. काटोल :- अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा पारडसिंगा वॉर्ड क्र. ४ येथे दिनांक २७/०५/२०२३ चे १९.०० वा. ते दिनांक २९/०५/२०२३ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे- प्रल्हाद सखाराम लाड, वय ६० वर्ष रा. पारडसिंगा वॉर्ड क्र. ०४ हे आपले परिवारासह आष्टी जि. वर्धा येथे लग्नाला गेले होते यातील फिर्यादीचे शेजारी राहणारे निलेश ढोले यांनी फिर्यादीस फोन करून सांगीतले की तुमचे घराचे दाराचे कुलुप तुटलेले दिसत आहे. अशा माहीती वरून फिर्यादीने आपले राहते घरी येवून पाहीले असता हॉलच्या दरवाज्याचे कुलुप तूटलेले दिसले. बेडरूम मधील १५ वर्षापूर्वी घेतलेली कपाटात ठेवलेली सोन्याची पोत किंमती अंदाजे २०,०००/- रू, साडे तिन ग्रॅम कानातले टॉप्स किंमती अंदाजे ५०००/-रू., अडीच ग्रॅमचे सोन्याचे कानातले झूमके किंमती अंदाजे ५०००/-रू., सोन्याची साडेतिन ग्रॅमची अंगठी किंमती अंदाजे ५०००/-रू, व चांदीच्या जुन्या तोरडया किंमती अंदाजे १०००/- रू. असा एकुण ३६०००/- रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. १६२५ दलाल पो.स्टे काटोल मो. नं. ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :- अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा पंचवटी काटोल येथे दिनांक २७/०५/२०२३ चे ११.०० वा. ते दिनांक २९/०५/२०२३ चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे- कु. प्रज्ञा धनराज जामटकर, वय ४० वर्ष रा. पंचवटी ही दि. २९/०५/२०२३ चे ११/०० वा. आपल्या वडिल, भाऊ, वहिनी सह घराला कुलुप लावुन बाहेर गावी गेले होते १२/०० वा. घरी परत आले असता घराचे दरवाज्याचे कुलुप कोंडा तोडुन दिसले दरवाजा उघडुन पाहिला असता लोखंडी कपाटातील १) सोन्याचे कानातील झुमके ३ ग्रॅम किंमती ७०००/- रू. २) सोन्याची जुनी तीन ग्रॅम अंगठी किंमती अंदाजे ५,०००/- रुपये व नगदी ५०,०००/- रुपये असा एकूण ६२,०००/- रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. १६२५ दलाल पो. स्टे काटोल मो. नं. ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील झोलवाडी येथे दिनांक २९/०५/२०२३ चे २.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— मनोहर लकपंती खरपुरिया, वय ३० वर्ष रा. झोलवाडी ता नरखेड हे आपल्या पत्नी व मुलीसह सासरी गेले असता दिनांक २९/०५/२०२३ चे रात्री ०२/०० वा. दरम्यान फिर्यादीचे घराशेजारील बाई नामे—कुसुम कडसळीया यांनी फोन करून सांगितले की तुझा घरी चोर घुसला व आम्ही तुझ्या घरून चेतराम बदरी परोडिया, रा. झोलवाडी नरखेड याला तुझा घरातुन निघुन पळतांनी पाहीले फिर्यादीने सकाळी घराची पाहणी केली असता त्याला नगदी ३०,०००/—रूपये व दोन सोन्याची अंगठी किंमती १५,०००/—रूपये असा एकुण ४५,०००/—रूपयाचा मुद्देमाल दिसुन आला नाही. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. मनोज चौधरी मो. नं. ८४२४०४३४३५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**